पुण्यनगरी पा. नं. ३०

# सरकारी कर्मचारी संप सुरू ठेवण्यावर ठाम

## सरकारकडून ठोस काहीही सांगण्यात येत नसल्याचा आरोप ■ कर्मचारी सोमवारी थाळीनाद करणार

। मुंबई । जुनी निवृत्ती वेतन योजना पुन्हा लागू करण्याबाबत राज्य सरकारकडून ठोस काहीही सांगण्यात येत नसल्याचा दावा करत मागणी पूर्ण होईपर्यंत संप कायम ठेवण्याचा निर्धार संपकरी कर्मचाऱ्यांनी केला आहे. दरम्यान, सरकारी कर्मचाऱ्यांनी पुन्हा कामावर रुजू व्हावे, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संपकरी कर्मचाऱ्यांना केले आहे. त्याला प्रतिसाद न देता कर्मचारी सोमवारी राज्यभर सर्व सरकारी कार्यालयांसमोर थाळीनाद करत सरकारचे लक्ष वेधणार असल्याचे महाराष्ट्र कर्मचारी संघाचे अविनाश दौंड आणि मिलिंद सरदेशमुख यांनी म्हटले आहे.

संपामुळे सर्वसामान्य नागरिकांचे तसेच रुग्णांचे हाल होत आहेत. यामुळे कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत सरकारने अनेक सकारात्मक पावले उचलली आहेत. मागण्यांचा आढावा घेण्यासाठी तीन सदस्यीय समिती स्थापन केली आहे. या समितीच्या शिफारशींनंतर झालेला निर्णय दरम्यानच्या काळात निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांनाही लागू करू, याचा पुनरुच्चार मुख्यमंत्री शिंदे यांनी केला आहे. राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या नव्या पेन्शन योजनेत सुधारणा करण्यात येणार आहे.

मंत्रिमंडळाच्या बैठकीत तसा निर्णय झाला आहे. शासकीय कर्मचाऱ्यांना कुटुंब निवृत्ती वेतन आणि मृत्यू योगदान देण्याचा निर्णय मंजूर करण्यात आला आहे. यानंतरही सरकारकडून ठोस काहीही सांगण्यात येत नसल्याचे संपकरी कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. तसेच सरकारने 'मेस्मा'चा धाक दाखवल्याने कर्मचाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

संपाचा मोठा फटका राज्यात रुग्णसेवेला बसला आहे. संपामुळे ठप्प झालेली रुग्णसेवा सुरळीत व्हावी यासाठी रुग्णालयांमध्ये तातडीने तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी कर्मचाऱ्यांची भरती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तर आरोग्य विभागात कामावर रुजू होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या संख्येत वाढ झाली असली तरी अपुऱ्या कर्मचाऱ्यांअभावी काम खोळंबले आहे. त्यामुळे कक्ष सेवक, शिपाई, सफाई कामगार यांची कामे या कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून करून घेण्यात येणार असल्याची माहिती जे.जे. रुग्णालयाच्या अधिष्ठाता डॉ. पल्लवी सापळे यांनी दिली.

जुन्या पेन्शन योजनेसाठी सुरू असलेल्या आंदोलनाविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. वकील गुणरत्न सदावर्ते यांनी ही याचिका दाखल केली.

या याचिकेवर पुढील सुनावणी २३ मार्चला होणार आहे. संविधानाने प्रत्येकाला विरोधाचा अधिकार दिला आहे, असे उच्च न्यायालयाने म्हटले आहे. तर सरकारने हा संप बेकायदेशीर असल्याचे म्हटले आहे.

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner


पुण्यनगरी पा.नं. ३.

# पगार बढाओ इन पुलिसवालों का, इतने में घर नही चलता, इमान कैसे चलेगा

## ■ अनेक वर्षांपासून वेतनवाढ नसल्याने पोलीस खात्यात नाराजीचा सूर; समितीकडून नाही मिळाली 'बक्षिसी'

■ जाहेद शाह

। छत्रपती संभाजीनगर : 'पगार बढाओ इन पुलिसवालों का, इतने में घर नही चलता, इमान कैसे चलेगा' हा अमिताभ बच्चन यांचा 'अग्निपथ' सिनेमातील संवाद एकेकाळी प्रचंड गाजला होता. विजय दीनानाथ चौहान उर्फ अमिताभ यांनी म्हटलेला हा डायलॉग आज राज्यातील पोलिसांच्या वेतनवाढीबाबतच्या भावना व्यक्त करण्यास पुरेसा आहे. गेल्या अनेक वर्षांपासून वेतनवाढीची 'बक्षिसी' न मिळाल्याने पोलीस दलात नाराजीचा सूर उमटत असून, २४ तास विनासुट्टी काम करूनही इतर विभागांच्या तुलनेत कमी वेतन मिळत असल्याने त्यात वाढ कधी होणार? असा प्रश्न पोलीस दलातून उपस्थित केला जात आहे. राज्यस्तरीय पोलीसवृंद परिषदेतही हा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यावर पोलीस महासंचालकही निरुत्तर झाल्याचे पाहावयास मिळाले.



पोलिसांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी राज्याचे गृहमंत्री पोलीसवृंद परिषद भरवतात. यंदा ५४ वी परिषद पोलीस महासंचालक रजनीश शेठ यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत पार पडली. या परिषदेत इतर मुद्द्यांसोबतच पोलिसांच्या वेतनवाढीचा प्रश्नही उपस्थित करण्यात आला. महसूल आणि पोलीस विभाग हे एकाच सवर्गातील समजले जात. काही वर्षांपूर्वी यांना वेतनही समान पद्धतीनेच मिळत होते. परंतु सातवा वेतन आयोग लागू झाल्यापासून पोलीस व महसूल विभागाच्या वेतनात तफावत निर्माण झाली असून, ती दिवसेंदिवस वाढत चालली आहे. महसूल विभागाला सर्व शासकीय सुट्ट्या, धार्मिक सण कुटुंबासोबत साजरे करता येतात. या उलट पोलीस अधिकारी व अंमलदार यांना कोणत्याही प्रकारच्या शासकीय सुट्ट्या मिळत नाहीत.

पुण्यनगरी SUNDAY Story

महसूल विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या तुलनेत अधिक काम करूनही [illegible] असतानाही पोलीस विभागाला कमी वेतन मिळते. त्यामुळे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे मनोबल खालावत आहे. हा विषय पोलीस वृंद परिषदेत उपस्थित करण्यात आला होता. याची नोंद परिषदेच्या सभावृत्तांतात अनुक्रमांक १५ वर करण्यात आली आहे. या मुद्द्याचा विचार करून महसूलप्रमाणेच वेतनश्रेणी लागू करावी, अशी आग्रही मागणी यात करण्यात आली आहे.

### ■ सातवा वेतन लागू, अंमलबजावणी नाही

पोलीस दलाला सातवा वेतन आयोग लागू करण्यात आलेला आहे. त्याबाबतची घोषणादेखील करण्यात आली. मात्र त्याची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. महसूल प्रशासनातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना मात्र सातव्या वेतन आयोगानुसार पगार मिळत आहे. वास्तविक पाहता पोलीस दल सेवा बजावण्यात अग्रस्थानी असतात हे कोरोनाकाळातील त्यांच्या बलिदानावरून लक्षात येते. त्यामुळे त्यांची सेवा, त्याग व योगदान लक्षात घेऊन त्यांना वेतनवाढ करणे गरजेचे आहे.

### ■ बक्षी समितीचेही दुर्लक्ष

सातव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीसाठी स्थापन करण्यात आलेल्या बक्षी समितीनेदेखील पोलिसांवर अन्याय केला असल्याचे समोर आले आहे. राज्य वेतन सुधारित समिती ही २०१७ मध्ये स्थापन झाली होती. सेवानिवृत्त अपर मुख्य सचिव के. के. बक्षी हे समितीचे अध्यक्ष होते. त्यांनी पोलिसांना दुय्यम वागणूक दिल्याचे म्हटले जाते. १३ फेब्रुवारी २०२३ रोजी सातव्या वेतन आयोग शिफारशींचे परिपत्रक निर्गमित झाले. त्यात पोलिसांच्या वेतनवाढीचा योग्यतो विचार झालेला नाही. त्यामुळेही दलात नाराजी आहे.

**सध्या मिळणारे वेतन**

| पदनाम | वेतन |
|---|---|
| पोलीस महासंचालक | २ लाख २५,००० |
| अतिरिक्त पोलीस महासंचालक | २ लाख ५,००० |
| पोलीस महानिरीक्षक | १ लाख ४४ हजार २०० |
| पोलीस उपमहानिरीक्षक | १ लाख ३१,००० |
| वरिष्ठ पोलीस अधीक्षक | १ लाख १८ हजार ५०० |
| पोलीस अधीक्षक | ७८ हजार ८०० |
| अतिरिक्त पोलीस अधीक्षक | ६७ हजार ७०० |
| सहायक पोलीस अधीक्षक | ५६ हजार १०० |
| पोलीस निरीक्षक | ४४ हजार ९०० |
| पोलीस उपनिरीक्षक | ३५ हजार ४०० |
| हेड कॉन्स्टेबल | २५ हजार ५०० |
| कॉन्स्टेबल | २१ हजार ७०० |

**"बक्षी समितीचा अभ्यास केला जाईल**



पोलिसांच्या वेतनवाढीचा प्रश्न वृंद परिषदेत उपस्थित झाला होता. सदरील प्रकरण वेतन आयोगासमोर ठेवण्यात येईल. बक्षी समितीची शिफारस काय होती आणि समितीने काय निर्णय दिला याबाबत सविस्तर अभ्यास करण्यात येणार आहे. त्याबाबतच्या सूचना सामान्य प्रशासन विभागाचे अप्पर पोलीस महासंचालक यांना देण्यात आलेल्या आहेत.

–रजनीश सेठ, पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

सामना पा. नं. २

# काळजी घ्या, मुंबईत कोरोना पुन्हा वाढतोय

## दिवसभरात ७१ बाधित

मुंबई, दि. १८ (प्रतिनिधी) - देभरात झपाट्याने वाढणाऱ्या 'एच३एनर'ने इन्फ्लुएन्झा टेन्शन वाढवलेले असताना आता मुंबईत कोरोना रुग्णांची संख्याही वेगाने वाढत आहे. गेल्या दहा दिवसांपूर्वी १० ते २० पर्यंत स्थिरावलेली बाधितांची संख्या गेल्या चार दिवसांपासून ३० पर्यंत नोंद होत आहे. तर आज दिवसभरात केलेल्या १३७७ चाचण्यांमध्ये तब्बल ७१ कोरोनाबाधित आढळल्याने खबरदारी घेण्याची गरज आहे.

मार्च २०२० मध्ये मुंबईत कोरोनाने शिरकाव केल्यानंतर पालिका आणि तत्कालीन राज्य सरकारच्या प्रयत्नांमुळे कोरोना लढ्यात तीन लाटा यशस्वीरीत्या परतावून लावण्यात यश आले. मात्र आता मुंबईत पुन्हा



एकदा कोरोना रुग्णसंख्या वाढत असल्याचे दिसत आहे. आज दिवसभरात कोरोना बाधित ७१ रुग्ण आढळल्याने बाधित रुग्णांची एकूण संख्या ११ लाख ५५ हजार ७७४ वर पोहोचली आहे. तर दिवसभरात २५ रुग्णांनी कोरोनावर मात केल्याने आतापर्यंत ११ लाख ३५ हजार ७८१ रुग्णांनी कोरोनाला हरवले आहे. त्यामुळे मुंबईत सध्या २४६ सक्रिय रुग्ण असल्याची माहिती पालिकेच्या आरोग्य विभागाकडून देण्यात आली.

### कोरोनाच्या नवीन व्हेरिएंटमुळे चिंता वाढली

कोरोनाचा नवीन व्हेरिएंट 'एक्सबीबी'चा संसर्ग देशात पसरू लागल्याने चिंता वाढली आहे. गेल्या २४ तासांत ८०० नवीन रुग्णांची भर पडली आहे. १२६ दिवसांनंतर ॲक्टीव्ह रुग्णसंख्या ५३८९ वर गेली आहे. देशात सध्या एच३एनर अर्थात इन्फ्लुएंझा, एच१एन१ म्हणजे स्वाइन फ्लू चा व्हायरसने हल्ला केला असतानाच कोरोनाने पुन्हा डोकेवर काढल्यामुळे टेन्शन वाढले आहे. काही देशांमध्ये 'एक्सबीबी' हा कोरोनाचा नवीन व्हेरिएंट आढळला. या नवीन व्हेरिएंटने आता देशात महाराष्ट्र, गुजरातसह काही राज्यांमध्ये शिरकाव केला असल्याचे स्पष्ट झाले. कोरोना संसर्ग झालेल्या रुग्णांमध्ये हा नवीन व्हेरिएंट आढळला आहे. त्यामुळे रुग्णसंख्या झपाट्याने वाढत आहे.

पुढारी पा. नं. ७.

# कर्मचारी संपाची कोंडी कायम

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

जुन्या पेन्शनसाठी राज्य सरकारी, निमसरकारी कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या संपाची कोंडी पाचव्या दिवशीही कायम राहिली.

शुक्रवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधी सोबत बैठक घेणार होते. तसे निरोप कर्मचारी संघटनांना गेले होते, मात्र शेतकरी संपाचा वाढलेला तिढा आणि अन्य कामकाजामुळे ही बैठक होऊ शकली नाही. शनिवारी आणि रविवारी सुट्टी असल्यामुळे आता ही बैठक सोमवारी होण्याची शक्यता आहे.

या संपामध्ये मुंबई शहरातील सुमारे ३५, ०००कर्मचारी संपात सहभागी झाले आहेत . यामध्ये मंत्रालयासह मंत्रालयाच्या विविध खात्यांमध्ये काम करणारे कर्मचारी आणि हॉस्पिटल्स जिल्हाधिकारी कार्यालय सीएसटी जिल्हाधिकारी कार्यालय बांद्रा जिल्हाधिकार्यालय मुलुंड आणि जीएसटी कार्यालयाचा यात समावेश आहे.

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

लोकमत पा. नं. ६



भारतीय जनता पक्षाच्या वतीने एसके स्टोन मैदानात बागेश्वर धाम सरकार अर्थात धीरेंद्रकृष्ण शास्त्री महाराज यांच्या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. धीरेंद्रकृष्ण शास्त्री यांच्या दर्शनासाठी हजारोंच्या संख्येने लोक आले होते.

# मी देवाचा अवतार नाही

## धीरेंद्रकृष्ण शास्त्री; मीरा रोड येथे दर्शन सोहळ्याला मोठी गर्दी

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मी कुठलाही जादूटोणा करत नाही की देवाचा अवतार नाही. हिंदू धर्मासाठी आणि समाजासाठी माझे जीवन समर्पित आहे. त्यासाठी आयुष्यभर काम करत राहणार आहे, असे प्रतिपादन बागेश्वर धाम सरकार अर्थात धीरेंद्रकृष्ण शास्त्री महाराज यांनी मीरा रोड येथे शनिवारी केले.

भाजपच्यावतीने मीरा-भाईंदरच्या आमदार गीता जैन, भाजपचे जिल्हाध्यक्ष ॲड. रवी व्यास यांनी एसके स्टोन मैदानात हा सोहळा आयोजित केला होता. धीरेंद्रकृष्ण शास्त्री यांच्या दर्शनासाठी हजारोंच्या संख्येने लोक आले होते. आपण आयुर्वेदाच्या मंत्र चिकित्सेने उपचार करतो. आयुर्वेदिक उपचाराने ४० टक्के रुग्णांना लवकर आराम मिळतो. सनातन धर्माची आग धगधगती राहिली पाहिजे. ११ दिवस अखंड ज्योती प्रज्वलित ठेवण्याचे आवाहन त्यांनी उपस्थित भक्तांना केले. यावेळी शास्त्री यांनी त्यांच्या शैलीत विरोधकांना प्रत्युत्तर दिले. रविवारी जास्त वेळ हा कार्यक्रम चालणार आहे.

### कडक पोलिस बंदोबस्त

अंधश्रद्धा निर्मूलन समितीने कार्यक्रमाला विरोध केल्याने मोठा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तसेच मीरा रोड पोलिसांनी आयोजकांना प्रतिबंधात्मक नोटीस बजावली होती. धीरेंद्रकृष्ण शास्त्री महाराज यांच्याकडून राज्यातील संत व महापुरुषांचा अवमान होणार नाही, धार्मिक भावना दुखावणार नाहीत, आदींची खबरदारी घेण्यास पोलिसांनी सांगितले होते. नोटीशीचे उल्लंघन केल्यास गुन्हा दाखल करण्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

लोकमत ५.५.२०

# भाईंदर स्मशानभूमीतील धुरामुळे गुदमरतोय श्वास

## महापालिकेच्या चिमण्या कुचकामी, रहिवाशांच्या आरोग्याला धोका

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा - भाईंदर महापालिकेच्या भाईंदर पश्चिम स्मशानभूमीतील स्वयंचलित चिमण्या कुचकामी ठरल्याने मृतदेहावर अग्निसंस्कार करताना निर्माण होणाऱ्या धुराच्या प्रदूषणाने अंत्यविधीला येणाऱ्यांसह परिसरातील रहिवासी त्रस्त झाले आहेत.

भाईंदर पश्चिम भागातील ही एकमेव स्मशानभूमी आहे. या स्मशानभूमीत अंत्यविधीसाठी येणाऱ्या मृतदेहांची संख्या जास्त आहे. त्यामुळे येथे अंत्यविधीसाठी ४ शवदाहिन्या बसविण्यात आल्या आहेत. तर एक शवदाहिनी एलपीजी गॅसवरील आहे.



मृतदेहाचे दहन करण्यासाठी लाकडे जाळली जातात. त्यावेळी मोठ्या प्रमाणात धूर निर्माण होतो. मृतदेह आणि लाकडांचा धूर हा स्वयंचलित चिमण्यांनी वर जात नाही, तर तो खाली व आजूबाजूला सर्वत्र पसरतो.

### आंदोलनाचा इशारा

राष्ट्रवादी काँग्रेसचे मीरा भाईंदर १४५ विधानसभा अध्यक्ष राजन भोसले यांनीदेखील स्मशानभूमीतील चिमण्या ह्या इलेक्ट्रिकवरील आणि उंच आकाराच्या बसविण्याची मागणी आयुक्त दिलीप ढोले व कार्यकारी अभियंता दीपक खांबित यांना पत्र देऊन केली आहे. स्मशानभूमीलगत राहणाऱ्या सुमारे ६ ते ७ हजार रहिवाशांना धुराचा त्रास होऊन क्षयरोग, दमा, खोकला यासारख्या संसर्गजन्य आजारांना सामोरे जावे लागत आहे.

पालिकेने लावलेल्या चिमण्या ह्या चालत नसल्या की अंत्यविधीसाठी येणारे लोक धूर पसरल्याने त्रस्त होतात. धुरामुळे श्वास घेणेही अवघड होते.

स्मशानभूमीच्या सभोवताली मोठी लोकवस्ती आहे. स्मशानभूमीतील धूर रहिवाशांच्या घरात व परिसरात नेहमीच पसरत असल्याने त्यांना कायमचा त्रास सहन करावा लागत आहे. मृतदेह आणि लाकडे जाळल्याने निर्माण होणारा धूर मानवी आरोग्यासाठी अपायकारक असल्याने या भागातील नागरिकांना श्वसनाचे विकार, खोकल्यासारख्या आजारांना सामोरे जावे लागत आहे.

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

सकाळ पा. नं. ३.

२०२३

# शेतकऱ्यांचा लाँगमार्च स्थगित

## राज्य सरकारकडून आंदोलकांच्या सत्तर टक्के मागण्या मान्य

शहापूर, ता. १८ (बातमीदार) : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शेतकरी मोर्चेकऱ्यांच्या मागण्यांबाबत शुक्रवारी विधानसभेत सविस्तर निवेदन केल्यानंतर आज शासनाचे परिपत्रक घेऊन ठाण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी वाशिंद येथे येऊन मोर्चेकऱ्यांची भेट घेतली. राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या सत्तर टक्के मागण्या तात्काळ मान्य केल्या असल्याने आम्ही हे आंदोलन मागे घेत आहोत, अशी घोषणा शेतकरी नेते जिवा पांडू गावित यांनी आज केली.

शेतकऱ्यांच्या उर्वरित मागण्यांसाठी राज्य सरकारने एक समिती तयार केली आहे. काही मागण्या केंद्रस्तरावरील आहेत, त्यांचाही पाठपुरावा ही समिती करेल, असे सरकारने जाहीर केल्याने आज हा मोर्चा स्थगित करून मोर्चेकरी माघारी फिरत असल्याचे गावित यांनी जाहीर केले. या हजारो मोर्चकऱ्यांना गावी सोडण्यासाठी कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या १० तर खासगी ५ बस, वाशिंद ते नाशिक रोड एक विशेष ट्रेन व मोर्चेकऱ्यांच्या २००हून अधिक गाड्या अशी व्यवस्था करण्यात आली होती. आज दुपारी १ वाजून ५५ मिनिटांनी मोर्चेकऱ्यांना घेऊन एक विशेष ट्रेन वाशिंद स्टेशनहून नाशिकसाठी रवाना झाली.



**वाशिंद :** मोर्चेकरी विशेष गाडीने आपल्या गावाकडे परतले.

### पुंडलिक जाधव यांच्या मृत्यूमुळे जल्लोष टाळला!

आंदोलक शेतकरी यांनी आपल्या मागण्या मान्य झाल्याबद्दल समाधान व्यक्त केले. या लॉंगमार्चदरम्यान अनेक शेतकरी जखमी झाले. त्यातच या आंदोलनादरम्यान शुक्रवारी पुंडलिक जाधव या शेतकऱ्याचा मृत्यू झाला होता. त्यामुळे आंदोलकांनी मागण्या मान्य झाल्यावरही जल्लोष करणे टाळले.

आमच्या न्याय्य हक्कासाठी आम्ही नाशिक ते मुंबई लॉंगमार्च सुरू केला. मागील सात दिवसांत शेतकरी, कष्टकऱ्यांचे खूप हाल झाले. वयोवृद्ध, गरोदर माता व लहान मुलांनाही त्रास सहन करावा लागला. काही दुर्दैवी घटनादेखील घडल्या यात राज्य सरकारची चूक आहे. जर आम्ही मोर्चा घेऊन निघालो तेव्हा शासनाने नाशिक येथेच आमच्या मागण्या मान्य केल्या असत्या तर एवढा मोठा प्रसंग उद्भवला नसता.
- जिवा पांडू गावित, शेतकरी नेते.

राज्य शासनाने दिलेल्या आदेशानुसार महसूल विभागाशी निगडित ज्या काही मागण्या असतील व अन्य विषयांवरील काही मागण्या असतील, त्याबाबतचे शासन परिपत्रक मी आंदोलकर्त्यांचे नेते व शिष्टमंडळास दिले आहे. यावर शेतकऱ्यांचे समाधान झाले आहे.
- अशोक शिनगारे, जिल्हाधिकारी, ठाणे

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

NBT
नवभारत टाइम्स

# सात साल पुराने मामले में वांछित हत्यारोपी गिरफ्तार

## 3 आरोपी पहले ही हो चुके हैं गिरफ्तार | एक आरोपी को उम्रकैद की सजा

■ निसं, मीरा-भाईंदरः क्राइम ब्रांच यूनिट-1 ने सात साल पुराने हत्या के एक मामले में वांछित आरोपी अहमद सिद्की (41 वर्ष) को उत्तरप्रदेश से गिरफ्तार किया है। इस मामले में तीन अन्य आरोपियों को पुलिस पहले ही गिरफ्तार कर चुकी है। एक आरोपी को उम्रकैद की सजा सुनाई गई है। क्राइम ब्रांच के पीआई अविराज कुराडे के नेतृत्व में पुलिस ने इस वांछित आरोपी को पकड़ा है। यह मामला जुलाई 2016 का है। नया नगर पुलिस में चारों लोगों ने मिलकर रईस रोशन अनवर हुसैन की हत्या कर दी थी। आपसी रंजिश के चलते हुसैन का मर्डर हुआ था। इस मामले को सुलझाने में क्राइम ब्रांच के पुलिस अधिकारी कैलाश टोकले, संजय पाटिल, प्रशांत विसपुते और पुष्पेंद्र थापा का योगदान रहा।



हत्या के वांछित आरोपी को क्राइम ब्रांच के अधिकारियों ने उत्तर प्रदेश से गिरफ्तार किया।

• अमित तिवारी

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

MHT
# मुंबई हिंदमाता टाइम्स
राष्ट्रीय हिन्दी दैनिक
मुंबई, रविवार 19 मार्च 2023

# वसई विरार में नकली आटा बैचने वाले,चार कम्पनियों पर कॉपी राइट का मामला दर्ज





**वसई**, एक तरफ महंगाई बढ़ती नजर आ रही है वहीं दूसरी ओर नकली आटा पर नई ब्रांड के नाम पर नकली आटा बेचा जा रहा है। वसई विरार में सिल्वर कॉइन ब्रांडेड कम्पनी के नाम से बाजार में नकली आटा बेचा जा रहा है। शुक्रवार को संघवी फुड्स के लीगल एडवाइजर नायकर एसोसिएट्स के अधिवक्ता नेहा जैन, विजय मोरे, शुभम पाटील, प्रतीक केसरी व स्थानीय पुलिस की मदद से कामन रोड स्थित सागर होटल के पास नकली आटा बेचने वाली कंपनी पर बड़ी कार्रवाई की गई। कार्रवाई में भारी मात्रा में आटा जब्त किया है। पुलिस ने अलग अलग तीन से चार कम्पनियों पर कॉपी राइट का मामला दर्ज किया है। जानकारी के अनुसार इंदौर की संघवी फुड्स के लीगल एडवाइजर नायकर एसोसिएट्स को शिकायत मिली कि वसई पूर्व कामन स्थित सागर होटल के पास एक आटा कम्पनी है जो सिल्वर कॉइन ब्रांड कम्पनी का डुप्लीकेट सिल्वर कुम्भ और सिल्वर क्राउन नाम से आटा बनाती है। पर,यह फर्जी कम्पनी सिल्वर कॉइन ब्रांड के रजिस्टर्ड ट्रेडमार्क चिन्ह और रजिस्टर्ड कॉपीराइट डिजाइन का उल्लंघन कर सिल्वर कुम्भ और सिल्वर क्राउन के नाम से आटा में बेच रही थी। शिकायत के मद्देनजर फुड्स के लीगल एडवाइजर नायकर एसोसिएट्स की टीम ने सिविल न्यायालय में इसके खिलाफ मामला दर्ज किया। कोर्ट के आदेश के बाद टीम ने स्थानीय पुलिस की मदद से शुक्रवार शाम को वहाँ छापा मारकर भारी मात्रा में आटा जब्त किया है। यह कार्रवाई सिद्धि सिद्धि ट्रेडर्स, अन्नपूर्णा सुपर बाजार, शिवशक्ति ट्रेडर्स व सिल्वरस्टार सुपर बाजार पर की गई है। फुड्स अधिकारी ने बताया कि जैसे हमें शिकायत मिलेगी उसी आधार पर कारवाई की जाएगी। और इसमें सरसों का अवैध तेल मिलावटी पर जल्द कारवाई की जायेगी।

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

मुंबई हिंदमाता टाइम्स
आवश्यकता है

CMYK
MHT
# मुंबई हिंदमाता टाइम्स
राष्ट्रीय हिन्दी दैनिक
मुंबई, रविवार 19 मार्च 2023
आज का पंचांग | सूर्योदय / सूर्यास्त 6.26am 6.30pm | आज का मौसम | तापमान अधिकतम 31°C न्यूनतम 24°C | शेयर बाजार NSE BSE | सर्राफा बाजार

# वसई विरार में नकली आटा बेचने वाले, चार कम्पनियों पर कॉपी राइट का मामला दर्ज





**वसई**, एक तरफ महंगाई बढ़ती नजर आ रही है वहीं दूसरी ओर नकली आटा पर नई ब्रांड के नाम पर नकली आटा बेचा जा रहा है। वसई विरार में सिल्वर कॉइन ब्रांडेड कम्पनी के नाम से बाजार में नकली आटा बेचा जा रहा है।

शुक्रवार को संघवी फूड्स के लीगल एडवाइजर नवकार एसोसिएट्स के अधिवक्ता नम्रता जैन, विजय सोनी, शुभम पाटीदार, प्रतीक केशरी व स्थानीय पुलिस की मदद से कामन रोड स्थित सागर होटल के पास नकली आटा बेचने वाली कंपनी पर बड़ी कार्रवाई की गई। कार्रवाई में भारी मात्रा में आटा जब्त किया है। पुलिस ने अलग अलग तीन से चार कम्पनियों पर कॉपी राइट का मामला दर्ज किया है। जानकारी के अनुसार इंदौर की संघवी फूड्स के लीगल एडवाइजर नवकार एसोसिएट्स को शिकायत मिली कि वसई पूर्व कामन स्थित सागर होटल के पास एक आटा कम्पनी है जो सिल्वर कॉइन ब्रांडेड कम्पनी का डुप्लीकेट सिल्वर कूल और सिल्वर क्राउन नाम से आटा बनाती है। पर, यह फर्जी कम्पनी सिल्वर कॉइन उद्योग के रजिस्टर्ड व्यापार चिन्ह और रजिस्टर्ड कॉपीराइट स्टाइल का उल्लंघन कर सिल्वर कूल और सिल्वर क्राउन के नाम से आटा में बेच रही थी। शिकायत के मुताबिक फूड्स के लीगल एडवाइजर नवकार एसोसिएट्स की टीम ने दिल्ली वाणिज्यिक न्यायालय इसके खिलाफ मामला दर्ज किया। कोर्ट के आदेश के बाद टीम ने स्थानीय पुलिस की मदद से शुक्रवार शाम को वहाँ छापा मारकर भारी मात्रा में आटा जब्त किया है। यह कार्रवाई सिद्धि विनायक ट्रेडर्स, अन्नपूर्णा सुपर बाजार, शिवशक्ति ट्रेडर्स व हिमालय सुपर बाजार पर की गई है। फूड्स अधिकारी ने बताया कि जैसे हमने शिकायत मिलेगी उसी आधार पर कारवाई की जायेगी। और इसमें सरसों का अवैध तेल मिलावटी पर जल्द कारवाई की जायेगी।

Scanned with CamScanner

लोकमत

१ मार्चपासून धडक मोहीम : १८ दिवसांत १२९ रिक्षा जप्त

# अवैध रिक्षांवर आरटीओचा रात्रीच्यावेळी कारवाईचा बडगा

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : अवैध रिक्षा आणि बेशिस्त, नियमबाह्य वर्तन करणाऱ्या रिक्षाचालकांना चाप लावण्यासाठी विरार आरटीओ कार्यालयाने १ मार्चपासून धडक मोहीम सुरू करून रात्रीची तपासणी सुरू केली आहे. आरटीओ कार्यालयाने गेल्या १८ दिवसांत १२९ रिक्षा जप्त केल्या आहेत. जप्त केलेल्या रिक्षांबाबत त्यांची कागदपत्रे, फिटनेस-वाहन परवाना, बॅच नसणे आदी विविध कलमान्वये दंडात्मक कारवाई करण्यात आली. मात्र, त्यात सातत्य ठेवावे म्हणजे विनापरवाना, परमिट, बॅच नसणाऱ्या चालकांवर कारवाई होईल, त्यातून अनधिकृत चालक समोर येतील, अशी मागणी सामान्य नागरिकांनी आरटीओ प्रशासनाला केली आहे.



वसई-विरारमध्ये नियमांची पूर्तता न करणाऱ्या रिक्षा आणि बेशिस्त रिक्षाचालकांवर आरटीओकडून कारवाई केली जात आहे.

रिक्षांची रात्रीच्या वेळात तपासणी मोहीम सुरू असून, ती अशीच सुरू राहणार आहे. कागदपत्रे, परवाना नसलेल्या अनधिकृत रिक्षांवर कारवाई नक्की होणार.

- प्रवीण बागडे, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, विरार.

शहरात अनेक मार्गांवर परवाना नसलेल्या रिक्षांमधून अवैध प्रवासी वाहतूक सुरू आहे. विशेष म्हणजे, अनेक रिक्षाचालकांनी तीन प्रवाशांची क्षमता असलेल्या रिक्षांमध्ये बदल करून त्याची आसनक्षमता सहा ते आठ केली आहे. क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी बसवून धोकादायक वाहतूक केली जात आहे. रिक्षांमधील धोकादायक प्रवासी वाहतूक बंद करण्याचे आवाहन आरटीओ अधिकाऱ्यांनी केले होते. मात्र, या आवाहनाकडे दुर्लक्ष करून काही रिक्षाचालक शहरात प्रवासी वाहतूक करीत आहेत. वसईत विविध भागांत प्रादेशिक परिवहन विभागाचे कोळेकर, राजेश परदेशी, साळुंके, गिते, उगले या पथकाकडून रात्रीच्या वेळी तपासणी केली जात आहे. या तपासणीदरम्यान मुदत संपलेल्या रिक्षा तर थेट जप्त केल्या जात आहेत. याशिवाय जादा प्रवासी, गणवेश परिधान न करणे, थकीत दंड अशा विविध बाबींची तपासणी केली जात आहे. शहरातील विविध भागांत ही मोहीम कायम सुरू राहणार असल्याने मुदतबाह्य, बेशिस्त वाहनचालकांमध्ये कारवाईची भीती आहे.

Hello Vasai
Page No. 3 Mar 19, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

लोकमत

'डायल ११२' प्रणाली : नागरिकांना पोहोचवतात तत्काळ मदत

# मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस अव्वल

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : चोरी, घरफोडी, खून, बलात्कार, अपघात, हाणामारी, लूटमार अथवा कोणताही गुन्हा घडला की, सर्वप्रथम पीडितांना पोलिसांची आठवण येते. राज्य शासनाने अडचणीतील व्यक्तीच्या मदतीसाठी पोलिस तत्काळ घटनास्थळी पोहोचण्यासाठी ११२ ही डायल प्रणाली सुविधा अत्याधुनिक यंत्रणेसह नागरिकांच्या मदतीसाठी सुरू करण्यात आली होती. सन २०२२ मध्ये मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस दल अव्वल स्थानी होते. शुक्रवारी सकाळी पोलिस महासंचालक रजनीश शेठ यांनी पर्यवेक्षण अधिकारी पोलिस उपनिरीक्षक राणा परदेशी यांचे नायगाव येथे अभिनंदन केले आहे.

या डायल प्रणालीसाठी सहायक पोलिस आयुक्त विनायक नरळे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षण अधिकारी पोलिस उपनिरीक्षक राणा परदेशी, ६५ मार्शल आणि ९ डिस्पेचर उत्कृष्टपणे काम करीत आहेत.



पर्यवेक्षण अधिकारी पोलिस उपनिरीक्षक राणा परदेशी यांचे पोलिस महासंचालक रजनीश शेठ यांनी अभिनंदन केले.

## २०२२ मध्ये साधारण ३५ हजार कॉल झाले होते प्राप्त

- मागील वर्षी जानेवारी ते डिसेंबर २०२२ आयुक्तालयात ३४ हजार ९८७ कॉल प्राप्त झाले होते. पोलिस दलाने साधारणपणे ७ मिनिटे ३४ सेकंदामध्ये नागरिकांना मदत पोहोचवली होती.
- त्यामुळे २०२२ साली पोलिस आयुक्तालय अव्वलस्थानी होते. फेब्रुवारी २०२३ मध्ये पोलिस आयुक्तालयाचा रिस्पॉन्स टाइम हा ४ मिनिटे ९ सेकंद असल्यानेही फेब्रुवारी महिन्यातही अव्वल स्थानी होते.



Scanned with CamScanner

1 अप्रैल को रिहा हो सकते हैं सिद्धू! p12
NBT नवभारत टाइम्स
फ्रांस में पेंशन सुधार बिल पर छिड़े प्रदर्शन p12

# सात साल पुराने मामले में वांछित हत्यारोपी गिरफ्तार

## 3 आरोपी पहले ही हो चुके हैं गिरफ्तार | एक आरोपी को उम्रकैद की सजा

■ **निसं, मीरा-भाईंदरः** क्राइम ब्रांच यूनिट-1 ने सात साल पुराने हत्या के एक मामले में वांछित आरोपी अहमद सिद्दकी (41 वर्ष) को उत्तरप्रदेश से गिरफ्तार किया है। इस मामले में तीन अन्य आरोपियों को पुलिस पहले ही गिरफ्तार कर चुकी है। एक आरोपी को उम्रकैद की सजा सुनाई गई है। क्राइम ब्रांच के पीआई अविराज कुराडे के नेतृत्व में पुलिस ने इस वांछित आरोपी को पकड़ा है। यह मामला जुलाई 2016 का है। नया नगर पुलिस में चारों लोगों ने मिलकर रईस रोशन अनवर हुसैन की हत्या कर दी थी। आपसी रंजिश के चलते हुसैन का मर्डर हुआ था। इस मामले को सुलझाने में क्राइम ब्रांच के पुलिस अधिकारी कैलाश टोकले, संजय पाटिल, प्रशांत विसपुते और पुष्पेंद्र थापा का योगदान रहा।



हत्या के वांछित आरोपी को क्राइम ब्रांच के अधिकारियों ने उत्तर प्रदेश से गिरफ्तार किया।

• अमित तिवारी

Scanned with CamScanner